जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -३५२ दिनांक - १०/०५/२०२३**

**कोरेगाव पार्क पोलीस स्टेशन पुणे शहर**

सोसायटीचे वॉचमन यांना हत्याराचा धाक दाखवुन चंदन झाडाची चोरी करणारे
सराईत टोळीस ठोकल्या बेडया

कोरेगाव पार्क पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात चंदनाच्या झाडाची चोरी झालेबाबत कोरेगाव पार्क पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे त्या अनुषंगाने कोरेगाव पार्क पोलिस स्टेशनचे कार्यक्षेत्रात तपास पथकाचे अधिकारी व स्टाफ असे पेट्रोलिंग करित असताना **पोलीस नाईक विवेक जाधव व प्रविण पडवळ** यांना त्यांचे गोपनीय बातमीदारमार्फत माहिती मिळाली की, चंदनाची झाडे चोरणारे दोन इसम दु-चाकीवर कोरेगाव पार्क पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात लेन नं.५ मध्ये चंदनाचे झाडांची रेकी करत फिरत असलेबाबत कळविले असता.

सदरबाबत लागलीच लेन नं.५ कोरेगाव पार्क येथे चंदनाच्या झाडाची चोरी करणेकरिता आलेले दोन इसम यांना तपास पथकाचे मदतीने ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ता व त्यांचे ताब्यात असलेल्या दुचाकीबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांना लागलीच स्टाफचे मदतीने कोरेगाव पार्क पोलीस ठाणे येथे घेवुन येवुन त्यांचेकडे कोरेगाव पार्क पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या चंदनाच्या झाडांची चोरी केलेबाबत अधिक तपास केला असता त्यांनी कोरेगाव पार्क पुणे येथे चंदनाच्या झाडाची चोरी केले असलेबाबत सांगितले ताब्यात घेतलेल्या इसमांना अधिक विश्वासात घेवुन त्यांचे नाव व पत्त्याबाबत विचारले असता त्यांनी त्यांची नावे **१) फारूखॉ कदीरखॉ शोगन वय २० वर्षे, रा. जनजाला गाव ता. सिल्लोड औरंगाबाद, २) सिराज निजाम लडावत वय २२ वर्षे रा.जनजाला गाव ता.सिल्लोड औरंगाबाद** असे असल्याचे सांगितले, वर नमुद अटक आरोपींकडे तपास केला असता त्यांनी खालील प्रमाणे गुन्हे केले असलेबाबत निष्पन्न झाले आहे.**१) कोरेगाव पार्क पो.स्टे. गु.र.नं.१७/२०२३ भादंवि कलम ३७९,४२७ , २)कोरेगाव पार्क पो.स्टे गु.र.नं ६०/२०२३ भादविक ३९५, ४१२,३७९,.मुं.पो.अॅ.क.,३७(१)१३५ अशाप्रकारे एकुण ०२ गुन्हे उघडकीस आणुन गुन्हयात वापरलेली मोटार सायकल व चंदनाच्या झाडाची चोरी केलेले ओंडके असा किंमती मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि दत्तात्रय लिगाडे हे करित आहे.**

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त (पश्चिम), पुणे शहर श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परि.२ पुणे शहर, श्रीमती.स्मार्तना पाटील, मा.सहा पोलीस आयुक्त,लष्कर विभाग पुणे श्री.आर.एन.राजे.वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पोलीस ठाणे पुणे शहर,श्री.विनायक वेताळ, श्रीमती.दिपाली भुजबळ (गुन्हे) कोरेगाव पार्क पोलीस ठाणे पुणे शहर,यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथक प्रभारी सहा.पोलीस निरीक्षक दत्तात्रय लिगाडे, पोउनि संभाजी नाईक, पोलीस अंमलदार सपोफौ.नामदेव खिलारे, अमर क्षिरसागर, विशाल गाडे, संदिप जढर, विलास तोगे,रमजान शेख, गणेश गायकवाड विवेक जाधव, नितीन रावळ,प्रविण पडवळ, यांनी पार पाडली.